जनसंपर्क कक्ष

17 MAY 2019 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हा

# आर्थिक कमकुवत महाविद्यालयांना ११ लाखांचा निधी मंजूर

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालयांना महाविद्यालय अर्थसहाय्य योजनेतंर्गत ११ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. महाविद्यालयांकडून २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षासाठी आलेल्या प्रस्तावानुसार अनुदान वाटप प्रक्रिया सुरू केली आहे. यामध्ये पारंपरिक अभ्यासक्रमांचे शिक्षण देणाऱ्या ११ महाविद्यालयांचा समावेश आहे.

आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालयांसाठी विद्यापीठातर्फे २०१२ पासून अर्थसहाय्य योजना राबवली जाते. या अर्थसहाय्यामुळे संबंधीत महाविद्यालयांना प्राथमिक सोयी-सुविधांसह आर्थिदृष्ट्या सक्षम होण्यासाठी फायदा होतो. प्रस्तावातील मागणीनुसार ग्रामीण व दुर्गम भागातील महाविद्यालयांना प्राधान्यक्रमाणे निधी दिला जातो. अनुदानासाठी पात्र ठरलेल्या ११ महाविद्यालयांमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ५ , सांगली ४, तर सातारा जिल्ह्यातील २ महाविद्यालयांचा समावेश आहे.

**अनुदानासाठीचे नियम व अटी**

विद्यापीठाकडे निधीसाठी प्रस्ताव देणारे महाविद्यालय कायम विनाअनुदानित किंवा अंशतः विनाअनुदानित असणे आवश्यक आहे. महाविद्यालयाची स्थापना होऊन तीन वर्षांचा कालावधी पूर्ण असला पाहिजे. कला, विज्ञान व वाणिज्य यापैकी पारंपरिक शाखा सुरू असणे आवश्यक आहे. महाविद्यालयाने विद्यापीठाच्या शुल्काचा भरणा नियमित केलेला असावा तसेच नॅक मुल्यांकनाला प्राधान्य दिलेले असावे.



- **शिवाजी विद्यापीठातील अधिसभेची मान्यता**
- **महाविद्यालयांच्या प्राथमिक सोयी**
- **सुविधांसह आर्थिक स्तर उंचावण्यास मदत**

**महाविद्यालय निहाय निधीची रक्कम**

| | |
|---|---|
| शिवशाहू कॉलेज, सरूड, जि. कोल्हापूर | १ लाख रूपये |
| महिला कॉलेज, कसबा बीड, जि. कोल्हापूर | १ लाख रूपये |
| व्ही.के.चव्हाण पाटील कॉलेज, कारवे, जि. कोल्हापूर | १ लाख रूपये |
| लहू परितकर कॉलेज, पणोरे, जिल्हा कोल्हापूर | ७५ हजार रूपये |
| वाय. डी. पाटील कॉलेज, यवलूज, जिल्हा कोल्हापूर | ७५ हजार रूपये |
| विठ्ठल पाटील कॉलेज, सलगरे, जिल्हा सांगली | २ लाख ५० हजार रुपये |
| रावसाहेब पाटील कॉलेज, सावळज, जि. सांगली | ७५ हजार रुपये |
| म्हैसाळ कॉलेज, म्हैसाळ, जि. सांगली | ७५ हजार रूपये |
| राजमती पाटील कन्या कॉलेज, नेमिनाथनगर,सांगली | ७५ हजार रूपये |
| प्रा. संभाजीराव कदम कॉलेज, देऊर, जि. सातारा | ७५ हजार रूपये |
| कला वाणिज्य कॉलेज, कोयनानगर, जि. सातारा | ७५ हजार रुपये |

# शिवारातल्या घनसाळला विद्यापीठातील संशोधनाची जोड

Anuradha.kadam
@timesgroup.com
Tweet : anuradhakadamMT

**कोल्हापूर :** चव, सुवास, पौष्टिकता आणि दर्जा या वैशिष्ट्यांनी सतत मागणी असलेल्या आजरा घनसाळ या तांदळाच्या बियाणावर गेल्या तीन वर्षांपासून शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागातर्फे करण्यात आलेल्या संशोधनामुळे वार्षिक उत्पादनात ६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तांदुळ उत्पादनामध्ये कोल्हापूर ब्रँड असलेल्या या तांदळाला असलेल्या मागणीला वाढत्या उत्पादन टक्क्यामुळे शेतकऱ्यांसाठी आर्थिक स्रोताचा परीघ वाढला आहे.

## कमी कालावधीत वाढला उत्पादनाचा टक्का

कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील गावांमध्ये प्रामुख्याने पिकवल्या जाणाऱ्या आजरा घनसाळचा सीझन जून ते नोव्हेंबर या सहा महिन्यापर्यंत असतो. अनेक तांदुळ महोत्सवामध्ये या तांदळाला ग्राहकांकडून खूप मागणी आहे. मात्र उत्पादनाचा कमी कालावधी, पिकाची उंची जास्त असल्यामुळे पिक पडण्याचा धोका यामुळे मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असे प्रमाण होते. आजरा घनसाळ पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पादनाचा टक्का वाढावा यादृष्टीने शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागातर्फे गेल्या तीन वर्षांपासून संशोधनाची जोड दिली आहे. मुंबई येथील डॉ. होमी भाभा संशोधन केंद्राकडून या संशोधनासाठी मंजुरी मिळाली आहे. सध्या डॉ. एन. बी. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली शितलकुमार देसाई व आकेश जाधव हे विद्यार्थी आजरा येथील सरकारी बीज उत्पादन केंद्र परिसरातील चार एकर जमिनीवर आजरा घनसाळ तांदुळावर संशोधन करत आहेत.



**संशोधित बियाणांपासून उत्पादित केलेल्या आजरा घनसाळ या तांदळाचे पीक**

### संशोधनाचे टप्पे

सुरूवातीच्या टप्प्यात आजरा घनसाळची विद्यापीठाच्या प्रयोगशाळेत शुद्धता तपासणीसाठी डीएनए चाचणी करून घेण्यात आली. यानंतर चाचणी झालेले बीज कृषी विभागाला देण्यात आले व त्या बीजाचे जतन करून सीड फार्मच्या चार एकर जागेत बिजोत्पादन करण्यात आले. यासाठी कृषी विभागातर्फे विद्यापीठातील संशोधनप्रकल्पासाठी ५० हजार रूपयांचा निधी देण्यात आला. यशस्वी झालेल्या बीजापासून तयार झालेल्या आजरा घनसाळ तांदुळ पिकाची उंची अडीच फुटाने कमी झाली आहे. पूर्वी पिक पाच फूट उंच वाढत असल्यामुळे उंचीमुळे ते पीक खाली पडत होते, परिणामी पिकाचा दर्जावर परिणाम होत होता. तर उत्पादन पूर्ण होण्यासाठी लागणारा १६० दिवसांचा कालावधी कमी होऊन तो १२३ दिवसांवर आला असून या कालावधीत पिकाचे प्रमाण क्विंटलला सहा टक्क्यांनी वाढले आहे.



**कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा या तालुक्याचे नाव देशभरात पोहोचवणाऱ्या घनसाळ तांदळाला संशोधनामुळे आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात विद्यापीठाचे योगदान मोलाचे आहे. भविष्यात घनसाळचे पीक उत्पादन वाढले तर आजऱ्यातील ग्रामीण शेतकरी व युवा शेतकरी अधिक समृद्ध होतील.**

– **डॉ. देवानंद शिंदे,**
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ



**आजरा घनसाळला चांगली मागणी आहे. मात्र अनेकदा या तांदळात भेसळ केली जाते. कमी कालावधीमुळे मर्यादीत पिक हातात येत असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होत नाही. या संशोधनामुळे घनसाळ उत्पादनाचा कालावधी घटला आहे. तसेच उत्पादकता वाढली आहे.**

– **डॉ. एन. बी. गायकवाड,**
समन्वयक, संशोधन प्रकल्प

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2019
Times of India

# University starts declaring semester examination results

File Photo



Over 600 exams were conducted by the university this summer

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) started announcing results of the ongoing March 2019 semester examination for various subjects, Mahesh Kakade, Director, Board of Examinations and Evaluation, SUK, said.

He added that by May 16, around 20 results were announced, mostly of BA and BCom faculties. As the exams are still underway, overall semester results will continue to be declared till June end.

Kakade told TOI that with the help of decentralization of centres, the assessment process has been made speedy. Evaluators from the respective region have to reach only a nearer site. Evaluators from Satara district, for instance, can attend the evaluation process at the Satara-based CAP centre. He said many teaching staff were also exempted from election duty, or that might have caused a delay in declaration of results.

"With the availability of clock-hour basis (CHB) teachers, who have got more than three years' experience, the assessment process has become easier," he said. University officials told TOI that more than 600 examinations were conducted earlier this summer. The results that remain will be declared by the end of June.

It has to be noted that SUK last year asked colleges in the division to report names of teaching staff skipping assessment duties despite frequent notices.